**क्रमांक : १**

**महाराष्ट्र विधानपरिषद**
**पत्रक भाग दोन**

**गुरुवार, दिनांक ६ जानेवारी, २०२२/पौष १६, शके १९४३**

**१. सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, सोमवार, दिनांक २९ नोव्हेंबर, २०२१ रोजी महाराष्ट्र विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार महाराष्ट्र विधानपरिषदेचे अधिवेशन मंगळवार, दिनांक ७ डिसेंबर, २०२१ ते शुक्रवार, १७ डिसेंबर, २०२१ ऐवजी बुधवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२१ ते मंगळवार, दिनांक २८ डिसेंबर, २०२१ या कालावधीत आयोजित करण्यात आले होते. अधिवेशनाचा कालावधी दोन आठवड्याऐवजी एक आठवड्याचा करण्यात आल्यामुळे सन २०२१ च्या तृतीय (हिवाळी) अधिवेशनाकरिता मंत्रालयीन विभागास पाठविलेल्या दुसऱ्या आठवड्याचे दिनांक १४ डिसेंबर, २०२१ ते १७ डिसेंबर, २०२१ या कालावधीतील तारांकित प्रश्न आता फेरविचारांती अतारांकित स्वीकृत करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे तिसऱ्या आठवड्याकरिता घेण्यात आलेले तारांकित प्रश्न फेरविचारांती व्यपगत करण्यात आले आहेत.**

विधान भवन,
मुंबई.
दिनांक : ६ जानेवारी, २०२२

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद

**याची प्रत :**

(१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य.
(२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.
(३) संगणक कक्ष वेबसाईट.